**Historicity Research Journal** **Impact Factor : 1.9152 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 3 | Issue - 11 | July – 2017**

# ''गौतम बुद्धांच्या संदर्भात 'भगवा' या संकल्पनेचे विश्लेषण ''

**सीमा दि. बनसोडे[१] , प्रा.डॉ. व्ही. एस. शिंदे[२]**
**१एम.ए., एम.फील**
**[२]एम.ए.पीएच.डी संचालक, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे.**



***प्रस्तावना :***

माणसाला माणूस म्हणून शक्य तितक्या उन्नत अवस्थेत नेण्यासाठी प्रज्ञा, शील आणि करुणा यांचा मिलाफ कसा करावा याचे मार्गदर्शन अपेक्षित आहे. हे तिन्ही घटक मानवी जीवनात फार महत्त्वाचे आहेत. प्रज्ञा नसेल तर शील आणि करुणा यांना आंधळेपणा येईल. शील नसेल तर प्रज्ञा ही खरीखुरी प्रज्ञा न राहता ती विध्वंसक बुद्धी बनेल, याचा अर्थ त्यांच्या ठायी या तिन्ही घटकांचा असीम विकास झाला. त्यांच्यातील मनुष्यत्वाने अमर्याद उंची गाठली.

**भगवा :**

पाली वाङ्मयात गोतम बुद्धांना उद्देशून पुन:पुन्हा वापरण्यत आलेला आणखी एक शब्द म्हणजे 'भगवा' याचा अर्थ सारांशाने सांगायचा झाला तर 'भगवा' म्हणजे 'उत्तम गुणांनी संपन्न' असे म्हणता येईल. या शब्दाचे मूळ रुप 'भगवत्' असे आहे. 'भगवा' म्हणजे त्याचे प्रथमा विभक्ती मधील एकवचन होय. संस्कृतमध्येही 'भगवान' असे रुप वापरले जात असले, तरी पालीमध्ये 'भगवा' हेच रुप वापरले जाते. संगणकाच्या आधारे केलेली गणना मी येथे मुद्दाम नोंदवत आहे. मूळ पिटिकामध्ये हा शब्द ८७५८ वेळा आला आहे. तिपिटक अठ्‌ठकथा आणि टीका या सर्व ग्रंथाचा एकत्रित विचार केला, तर तो १७९४२ वेळा आला आहे. या ठिकाणी प्रथमेतील 'भगवा' या रुपाचाच विचार करायचा असल्यामुळे या शब्दाची इतर विभक्तींमधील रुपे येथे ध्यानात घेतलेली नाहीत. मूळ तिपिटकात एकच मजकूर अनेकदा पुनवरुक्त झालेला असतो. मुद्रित आवृत्त्यांमध्ये असा पुनरुक्त मजकूर नोंदवण्याऐवजी 'पेय्याल' या शब्दाने सूचित केला जातो. अशा पेय्यालांनी सूचित केलेल्या मजकुरांमधील 'भगवा' शब्दांची संख्या जमेला धरली, तर वर दिलेल्या संख्येत आणखी बरीच भर पडेल.

मराठीतील 'भगवा' या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृतमधील 'भृगु' या शब्दापासून झाल्याचे कृ.पा. कुलकर्णी यांनी नोंदविले आहे.[२] त्यांनी आपल्या या मताचा केवळ निर्देश केला आहे त्याचे काही स्पष्टीकरण केलेले नाही. या शब्दाच्या व्युत्पत्तीविषयी काही संभाव्य पर्यायही त्यांनी सुचविलेले नाहीत. स्वाभाविकच, कुलकर्णी यांनी सुचविलेली व्युत्पत्ती कृत्रिम आणि अनैतिहासिक आहे, असे म्हणता येते. त्यामुळे 'भगवा' आणि 'भृगु' यांचा काही संबंध नाही, हे ध्यानात घ्यायला हवे. मी असे का म्हणतो, ते पुढे केलेल्या विवेचनावरुन स्पष्ट होईल, असे मला वाटते.

एकीकडे 'भगवा' हा शब्द गोतम बुद्धांना उद्देशून इतक्या वेळा वापरला गेला आहे आणि दुसरीकडे तो शब्द एका रंगाचा द्योतक आहे. या दोन गोष्टींचा एकमेकांशी अत्यंत जवळचा संबंध आहे. विविध गुणांनी संपन्न या अर्थाने वापरला जाणारा भगवा हा शब्द गोतम बुद्धांचा द्योतक आहे. त्यांचे चीवर म्हणजे शिक्खूंनी वापरावयाचे वस्त्र रंगीत होते. बौद्ध भिक्खूंचे चीवर ज्या ज्या रंगामध्ये असते. त्या रंगापैकी भगवा हा एक महत्वाचा रंग आहे. गोतम बुद्धांना उद्देशून वापरला जाणारा भगवा हा शब्द काळाच्या ओघात लक्षणेने त्यांच्या चीवराचा रंग दर्शविण्यासाठी वापरला जाऊ लागला आणि मग 'भगवा' हा शब्द एका रंगाचा द्योतक बनला.

पुढच्या काळात गोतम बुद्धांचा विचार अत्यंत प्रभावी झाला. प्रभावी विचार प्रत्यक्ष घाव घालून खोडता येत नसेल, तर तो आपलाच आहे असे म्हणून त्याला पचवून टाकायचे आणि त्याला आपल्या चौकटीमध्ये बसवून पराभूत करायचे. हा आपला नेहमीचा डावपेच वैदिकांनी येथेही वापरला. गोतम बुद्धांना पचविण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणूनच वैदिकांनी भगवा हा शब्द स्वीकारुन तो आपल्या संस्कृतीचा एक मानबिंदू बनवला आणि गोतम बुद्धांवरील प्रेमामुळे भगव्या रंगाविषयी आदर असलेला बहुजन समाज नकळत वैदिक संस्कृतीशी जोडला गेला, हळूहळू बुद्धांपासून तुटून वैदिकांच्या बंधनात अधिकाधिक अडकत गेला.

प्रा. जगन्नाथ उपाध्याय यांनी म्हटले आहे.[३] ''मैं आपसे निवेदन करना चाहता हूँ कि सारे हिन्दू धर्म के ग्रंथों में, ईश्वर के साथ कभी भगवान शब्द लगा नहीं था। यह भगवान् टाइटिल है मनुष्य का और वह टायटिल भगवान् बुद्ध के कारण बनी, तब देवता मनुष्य से नीचा समझा जाने लगा, क्योंकि वह विलासी है और मनुष्य श्रेष्ठ हैं। क्योंकि वह कर्मयोगी है, वह महान् त्याग भी कर सकता है। बडे-बडे आदर्शो के लिए बलिदान भी कर सकता है। इसलिए वह भगवान है। जब भगवान बुद्ध के साथ भगवान शब्द जुडने लगा, तो ईश्वरवादी हिंदू कभी चूकता नहीं। भागवत आदि ग्रंथों में, उसने भी अपने सभी देवताओं के साथ भगवान् शब्द जोड दिया। बौद्ध दृष्टि में भगवान शब्द का अर्थ यह होता है कि जो

समस्त दुनिया के दुःखों को, और दुःखी लोगों को दुःख से छुटकारा दिलाने के लिए, उद्धार करने के लिए संकल्प करे, वह भगवान् होता है। ईश्वर कभी भगवान नहीं होता। ... लेकिन अपने ईश्वर को चलाने के लिए मनुष्य की जो टाइटिल थी, पदवी थी, देवता के साथ लगा दिया। और देवता के साथ जोड दिया गया।"

आपल्याला आपला खरा खुरा वारसा समजून घ्यायचा असेल, तर आपल्या सांस्कृतिक इतिहासामध्ये झालेल्या अशा प्रकारच्या उलथापालथी समजून घेणे फार महत्वाचे आहे. हल्ली विशिष्ट ध्वज वा पताका यांच्या संबंधात 'भगवा' या शब्दाचा वापर होतो. विशिष्ट संप्रदाय, व्यक्ती यांच्याबरोबर त्यांचा संबंध जोडला जातो. तो वैदिक परंपरेशी जोडलेला रंग आहे, या समजुतीमुळे अनेक समतावादी, परिवर्तनवादी, अवैदिक व्यक्तींना त्या रंगाविषयी दुरावाही वाटतो. किंबहुना, दुराव्यांच्याही पलीकडची अधिक तीव्र भावनाही त्यांच्या मनात निर्माण होते. या घोटाळ्यातून बाहेर पडणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

वैदिकांनी संस्कृतमध्ये लेखन केल्यामुळे, त्यांनी, 'भगवा' या पाली शब्दाऐवजी 'भगवान' हे त्यांचेच संस्कृत रुप आपल्या देवांसाठी वापरले. त्यांनी वेगळा शब्द वापरला असे नाही. स्वाभाविकच 'भगवान' हा शब्द मूलतः गोतम बुद्धांचे विशेषण होता, हे प्रा. उपाध्यायांचे मतही ऐतिहासिकदृष्ट्या योग्यच आहे. रुप वेगळे वापरले, एवढ्या कारणाने शब्द वेगळा होत नाही. इंग्रजांनी 'मुंबई' शब्दाचे 'बाँबे' केले, याचा अर्थ त्यांनी त्या शहराला नवे नाव दिले असे होत नाही, तर त्या शहराच्या मूळच्या नावाचेच फक्त वेगळे रुप वापरले, तसेच हे आहे.

**भागवत संप्रदायाला तथागतांची प्रेरणा :**

भागवत संप्रदायाचे 'भागवत' हे नाव 'भगवत' या शब्दापासून आले आहे. भगवंताला मानतो तो भागवत, असा त्याचा अर्थ आहे. आता 'भगवत' हा शब्द भारताच्या इतिहासात सर्वप्रथम तथागतांना उद्देशून वापरण्यात आला होता, हे ध्यानात घेता भगवत संप्रदायाला त्यांच्या विचारांतून प्रेरणा मिळाली, हे उघड आहे. शंकराचार्यांनी भागवत संप्रदायाला अवैदिक का मानले आणि भागवत संप्रदायाने अहिंसा वगैरे तत्वे का उचलून धरली, याचा उलगडा या ऐतिहासिक वास्तवातून होतो. पुढच्या काळात या संप्रदायाचे मोठ्या प्रमाणात वैदिकीकरण घडविण्यात आले, ही गोष्ट वेगळी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर भगव्या ध्वजाला अनुकूल :**

'भगवा' या शब्दाचे तथागतांशी असलेले नाते ठाऊक असल्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात भगव्या ध्वजाविषयी आपलेपणा होता, किमान विरोध नव्हता, असे म्हणता येते. या दृष्टीने धनंजय कीर यांनी केलेली पुढील नोंद पाहण्यासारखी आहे. "ते घटना समितीच्या ध्वज समितीचे सभासद होते. त्यावेळी राष्ट्रध्वज कोणत्या स्वरुपाचा असावा, याविषयी सर्वत्र चर्चा सुरु होती. याबाबतही काही महाराष्ट्रीयन नेत्यांनी मुंबई प्रांतिक हिंदु सभेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली. जर वजनदार गोटातून याबाबतीत चळवळ होऊन प्रभावी लोकमत निर्माण झाले, तर आपण ध्वजाचा रंग भगवा असावा या त्यांच्या सूचनेला ध्वज समितीत उचलून धरु, असे त्यांनी अनंतराव गद्रे, प्रबोधनकार ठाकरे आणि गावडे यांना अभिवचन दिले. १० जुलैला आंबेडकर जेंव्हा दिल्लीला जावयास निघाले, तेंव्हा सांताक्रूझ विमानतहावर मुंबई प्रांतिक (सभेचे) हिंदुसभेचे नेते आणि काही मराठे पुढारी यांनी आंबेडकर विमानात बसावयास जातेवेळी त्यांना एक भगवा ध्वज अर्पण केला. भगव्या ध्वजासंबंधी जर चळवळ झाली, तर त्याला आपण पाठिंबा देऊ, असे त्यांनी त्यास अभिवचन दिले."

आंबेडकर भगव्या ध्वजाच्या सूचनेच्या बाजूने ध्वज समितीत चार शब्द बोलले असे म्हणतात परंतु संबंधित नेत्यांनी भगव्या ध्वजासाठी तशी विशेष अशी चळवळ न केल्यामुळे त्यांनी अशोक चक्रांकित ध्वज मान्य करुन घेण्यासाठी आपले वजन खर्च केले.

**संदर्भ :**

१) मराठी व्युत्पत्तिकोश- 'भगवा' हा शब्द पुरवणीसह तिसरी आवृत्ती ,सुभदा सारस्वत प्रकाशन ,पुणे ५,पुनमुद्रण-१९९६.

२) बौध्द मनीषा-प्रो जगन्ननाथ उपाध्यय के निबंन्धों का संकलन खण्ड-२ (हिंन्दी), संपा- प्रो.रामशंकर त्रिपाटी ,प्रका.-केन्द्रीय बौध्द विवदया संस्थान,चोगलमसर,लेह (लद्दाय),२००१,प्र.५१२-५१३.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर- ले.धनंजय कीर;प्रका.-पॉप्युलर प्रकाशन ,मुंबई ३४,दुसरी आवृत्ती १९७७; प्र.४०८-४०९.